# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र : 28192828

जा.क्र.मनपा/मुलेप/७३ /2019-20 दि.१७ / १० /2019

प्रति

श्री. रोहित सुवर्णा
घर नं. १४८८,
मनपा शाळेसमोर
मुर्धा गाव, भाईंदर (प.)

२८
१७/१०/१९

विषय:- माहिती अधिकार अधिनियम २००५
माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मला (नागरीकांना)
अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करुन देणे बाबत..
संदर्भ:- आपला दि.09/10/2019 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय माहिती अधिकार अर्जान्वये आपण दि.14/10/2019 रोजी दुपारी 3.00 वाजता आपणांस अपेक्षित असलेल्या माहितीच्या अवलोकना करीता उपस्थित राहणार असल्याबाबत कळविले होते. तथापि सदर दिवशी आपण अवलोकना करीता उपस्थित राहीले नाहीत.

तरी दि.21/10/2019 रोजी विधानसभा 2019 च्या निवडणुका असुन निकाल दि.24/10/2019 रोजी आहे. बहुतांशी कार्यालयीन कर्मचारी वर्ग निवडणुक कामात व्यस्त असल्याने दि.24/10/2019 नंतर आपणांस सोयीस्कर दिवस व वेळ अभिलेख अवलोकना करीता कळविण्यात यावी ही विनंती.

EM942389303IN IVR:6977942389303
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:6,18/10/2019,11:58
To:ROHIT SUWARNA,SRI NIWAS
PIN:401101, Bhayander West S.O
From:MIRA BHAYANDER MAHANAGR,BHYW
Wt:10gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>

भारतीय डाक
India Post

(चारुशिला खरपडे)
जन माहिती अधिकारी तथा
सहा. लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

भ्रमणध्वनी नं. ९८६७४९८८१३

लेखा परिक्षण विभाग
आवक:- २४
दिनांक:- ९/१०/१९

# रोहित मो. सुवर्णा

**माजी स्वीकृत नगरसेवक**

**मिरा - भाईंदर महानगरपालिका**

घर नं. १४८८, 'श्री' निवास, मनपा शाळे समोर (साने गुरूजी भवन) उत्तन रोड, मुर्धा गांव, पो. भाईंदर (प.) ता. जिल्हा ठाणे - ४०१ १०१.

**निवडणुक / तातडीचे /महत्वाचे**

**दिनांक:- ०९/१०/२०१९**




**प्रति,**

**मा. मुख्य ~~परिवेक्षक~~** लेखा परिक्षक
मिरा-भाईंदर महानगरपालिका,
लेखा विभाग यांचे कार्यालय,
मुख्य कार्यालय, ४था मजला,
भाईंदर (प.), जिल्हा ठाणे - ४०१ १०१.

**सदंर्भ:- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.४५/कार्या-६ सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई-३२ दि. २६/११/२०१८**

**विषय: माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मला (नागरिकांना) अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करून देणेबाबत....**

**महोदय,**

मी आपणांस कळवू इच्छितो की, शासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येण्यासाठी व माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त माहिती अर्जाची प्रथम व द्वितीय अपीलांची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने राज्यातील जिल्हा स्थरीय कार्यालयापासून ते निम्नस्तरीय सर्व कार्यालयात तसेच महानगरपालिका, नगरपरिषद,जिल्हा परिषद इत्यादी सर्व कार्यालयात प्रत्येक सोमवारी दुपारी ३ ते ५ वाजे पर्यंत या वेळेत नागरिकांना, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विहित प्रक्रियेअनुसार त्यांच्या मागणीनुसार अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून दयावेत असे मा. अपर मुख्य सचिव, श्री. बिपीन मल्लिक (भा.प्र.से.), सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांनी दिनांक २६/११/२०१८ रोजी शासन परिपत्रक तत्कालिन महामहिम राज्यपाल श्री. सी. विदयासागर राव यांच्या आदेशानुसार व नावाने काढलेली आहे.

तरी कृपया मला श्री. नरेंद्र लालचंद मेहता हे महापौर या पदावर असताना पोलीस संरक्षण घेतलेली होती. पोलीस कार्यालय, मिरा रोड पोलीस ठाणे यांच्या मागणी अनुसार महानगरपालिकेने दोन वेळा रक्कम मनपा फंडातून भरणा केलेली आहे. मेहता यांना दिनांक २१/०९/२००९ रोजी भरपाई तत्वावर पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाचे थकीत बिलाबाबत वरिष्ठ पोलीस निरिक्षक मिरा रोड पोलीस ठाणे यांनी कळविले होते. तसेच दिनांक १६/०१/२००८ रोजी तत्कालिन उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. बालाजी खतगांवकर तसेच दिनांक ०७/०१/२०१० रोजी तत्कालिन आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक यांनी श्री. नरेंद्र मेहता महापौर यांना पत्र पाठवुन पत्र प्राप्त होताच त्वरित रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात यावी असे कळविले होते.

कृपया मला शासन परिपत्रक अनुसार सोमवार दि.१४/१०/२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता आपल्या कार्यालयामध्ये उपरोक्त विषयाबाबतची संपुर्ण नस्ती/ सर्व कागदपत्रे/पुरावे (अभिलेख) अवलोकनासाठी उपलब्ध करून दयावी ही नम्र विनंती.

जन माहिती अधिकारी
उचित कार्यवाहीस्तव

सदर दिनांकी
अर्जदार अवलोकना
करिता उपलब्ध
११.१० कार्यालयात आले

आपला विश्वासू,

रोहित सुवर्णा ०९/x/१९

**रोहित मो. सुवर्णा**
**अर्जदार**